Annex - f

14

## उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग पुणे, यांचे कार्यालय सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.

विषय :- मौजे गांबुर्डी येथील स.नं. ८१ व ९४ मधील ०.७४४६ हेक्टर क्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गतचा प्रस्ताव सिम्बॉयसिस सोसायटी, पुणे.

जा. क्र. कक्ष 3/जमीन/ 9 6 0 e /२००६ २००७.

पुणे - ४११ ००४, दिनांक 2 ऑगस्ट २००६.

प्रति,

संचालक,
सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट,
सेनापती बापट मार्ग, पुणे ४.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/जमीन/४६६, दिनांक २३/६/२००६.

महोदय,

कृपया संदर्भांकित पत्राचे अवलोकन होणेस विनंती.

विषयांकित प्रकरणातील प्रस्तावाचे प्रस्तावित केलेल्या ०.७४४६ हेक्टर वनक्षेत्रासंबंधी वनांचे मालमत्ता मुल्य (NPV) हे पुणे शहरातील सेनापती बापट रस्त्याच्या परिसरात असलेल्या प्रचलित बाजार मुल्याप्रमाणे ७,२१,८८,९७०/- (सात कोटी एकवीस लाख अठ्ठयांऐंसी हजार नऊशे सत्तर रूपये फक्त) परीगणित होत आहे.

आपले हमीपत्र वनक्षेत्र मागणी प्रस्तावाच्या संस्करणासाठी अत्यावश्यक आहे. त्या शिवाय वरीष्ठ कार्यालय स्तरावर प्रस्तावाचे संस्करण होणार नाही याची नोंद घ्यावी. आपले रूपये ७,२१,८८,९७०/ चे हमीपत्र या कार्यालयास दिनांक ७/८/२००६ पर्यंत (७ प्रतीत) या कार्यालयास प्राप्त न झालेस आपली वनक्षेत्र मागणी प्रस्तावातील आवश्यक पुर्तता न केल्याबद्दल प्रकरणावरील संस्करण बंद करण्यात येईल.

आपणास असेही निदर्शनास आणुन देण्यात येत आहे की, आपण अपेक्षीत पुर्तता न केल्यास आपली वनक्षेत्र मागणी बाबत उत्सुकता नाही, असे गृहीत धरून आपलेकडून वनक्षेत्राचा होत असलेल्या असंवैधानिक / अनाधिकृत वापर गांभिर्याने हाताळण्याच्या दृष्टीकोणातून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत असलेल्या तरतूदीचा वापर करून आपले विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सोबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-१/जमीन/प्रस्ताव-३४/३६९, दिनांक २९/६/२००६ ची छायांकित प्रत जोडली आहे.

सोबत - सहपत्र वरील प्रमाणे.

आपला विश्वासू

उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग पुणे

प्रतिलिपी,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांना त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१/जमीन/प्रस्ताव-३४/३६९, दिनांक २९/६/२००६ च्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

**उपवनसंरक्षक**
**पुणे वन विभाग, पुणे**

E:\Land Sec\Vikas\Letter to CCF reg Symbiosis society pune.doc